शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यात सुरु असलेल्या अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र/एचएमसीटी/एमबीए/एमसीए/ पीजीडीएम महाविद्यालयातील व्यवस्थापनातील द्विपदवी अभ्यासक्रम अणि इंटीग्रेटेड अभ्यासक्रमास शासन मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**

शासन निर्णय क्र. टिईएम-२०१३/(प्र.क्र. १८८)/तांशि-४,

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,

दिनांक : १५ मे, २०१३.

**वाचा:** १) संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्र.२/एनजीसी/२०१३/६३१, दिनांक १४.०५.२०१३.

२) शासन पत्र, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक MIS-२०१२/(CR ६५)/TE-४, दिनांक २९.०१.२०१३

३) शासन पत्र, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक MIS-२०१३/(CR ८४)/TE-४, दिनांक २८.०३.२०१३.

**प्रस्तावना :-** शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने राज्यात सुरु असलेल्या खाजगी विना अनुदानित अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तुशास्त्र / एचएमसीटी / एमबीए/ एमसीए / पीजीडीएम महाविद्यालयातील द्विपदवी अणि इंटीग्रेटेड अभ्यासक्रमास मान्यता दिली आहे. त्यानुसार शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी राज्यात सुरु असलेल्या खाजगी विनाअनुदानित अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तुशास्त्र / एचएमसीटी / एमबीए / एमसीए / पीजीडीएम महाविद्यालयातील द्विपदवी अणि इंटीग्रेटेड अभ्यासक्रमास मान्यता दिलेली मान्यता विचारात घेऊन सोबत जोडलेल्या **परिशिष्ट - १, २, ३, ४ व ५** मधील संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्यानुसार द्विपदवी अणि इंटीग्रेटेड अभ्यासक्रम सुरु करण्यास शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) सदर मंजूरी कायम विनाअनुदान तत्वावर राहील.

२) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेचे प्रवेशक्षमता वर नमुद केल्याप्रमाणे राहील. .

३) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र राज्य विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील तरतूदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक राहील.

५) संबंधित संस्थेने संचालक, तंत्रशिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

६) सदर पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

७) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

८) संस्थेने त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वी फार्मसी ॲक्ट, १९४८ च्या कलम १२ मधील तरतूदीनुसार फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची विहित मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

९) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादी बाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

१०) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, क्लासरुम इ.) करणे आवश्यक आहे.

११) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणेआवश्यक राहील.

१२) याशिवाय संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

१३) दुसऱ्या पाळीसाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी विहित केलेल्या/करावयाच्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

१४) या शासन निर्णयाद्वारे मान्यता दिलेल्या ज्या संस्थांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचाकडे राज्य शासनामार्फत प्रस्ताव सादर न करता थेट प्रस्ताव सादर केले असतील तसेच ज्या संस्थांना राज्य शासनाची नकारात्मक शिफारस आहे अशा संस्थांना मान्य झालेल्या अभ्यासक्रमासाठी शासनामार्फत राबविण्यात येणारी फी-प्रतिपूर्तीची योजना लागू राहणार नाही. या अटीनुसार संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०५१६१६१०२५५००८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(म. मा. मोरवे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय (सर्व), (संचालकामार्फत)
३. सर्व विद्यापीठांचे कुलसचिव, (संचालकामार्फत)
४. सर्व संबंधित संस्था (संचालकांमार्फत)
५. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
७. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१.
८. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), नवी दिल्ली.
९. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई
१०. निवड नस्ती/तांशि-४

Annexure IV

Government Resolution No. TEM-2013/C.R. no. 188/TE-4, dated 15th May, 2013

Institutes approved by AICTE under Dual Degree Programme

| Sr-No | Institute Code | ApplicationNumber | Institute Name | Programme | Level of Course | Name Of Course | Approved Intake12-13 | Intake Applied for13-14 | Approved Intake13-14 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 6777 | 1-1465332182 | INDIRA GLOBAL BUSINESS SCHOOL | MANAGEMENT | Dual Degree | MASTERS OF APPLIED MANAGEMENT | 0 | 60 | 60 |
| 2 | 5150 | 1-1478449762 | R.C.P.E.T'S INSTITUTE OF MANAGEMENT RESEARCH & DEVELOPMENT,SHIRPUR | MANAGEMENT | Dual Degree | MASTERS DEGREE IN COMPUTER APPLICATION S | 0 | 60 | 60 |